पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – २२०**
(सभावृत्तांत)

**दिनांक – २८/०४/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **२८/०४/२०२१** रोजी **दुपारी २.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा. सदस्य सभागृहात तसेच काही सन्मा.सदस्य ऑनलाईन द्वारे तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९. मा.सुलक्षणा राजू धर
१०. मा.भोईर सुरेश शिवाजी
११. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.भालेकर प्रविण महादेव
१४. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील – आयुक्त, मा.विकास ढाकणे – अति.आयुक्त (१), मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.राय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.नाळे – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.चारठाणकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.लडकत, मा.खाबडे – प्र.सह शहर अभियंता, मा.बोदडे, मा.बहुरे – सहा.आयुक्त, मा.गायकवाड – प्र.मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पाटील – प्राचार्य आयटीआय, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा,गलबले, मा.गट्टूवार, मा.मोरे, मा.सेठिया, मा.देशमुख, मा.काळे, मा.टकले, मा.नरोना, मा.राऊत, मा.धुमाळ,

मा.वाघुंडे, मा.भोसले, मा.पवार – कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशु वैद्यकिय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.देशमुख, मा.पानसरे – प्रशासन अधिकारी तथा प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.जरांडे – मुख्य सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.गोफणे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

-----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२८) महानगरपालिकेत कोरोनाबाधित रुग्णांच्या उपचाराकरिता अपु-या पडलेल्या ऑक्सिजन 02 मेडीकल गॅस (Medical Ozygen) निर्मिती करीता ऑक्सिजन जनरेटर प्लांट (1050 LPM) खरेदीकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.२९) महानगरपालिकेत कोरोनाबाधित रुग्णांच्या उपचाराकरिता अपु-या पडलेल्या ऑक्सिजन 02 मेडीकल गॅस (Medical Ozygen) निर्मिती करीता ऑक्सिजन जनरेटर प्लांट (960 LPM) खरेदीकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.३०) Appointment of Principal Consultant for Setting-up & Managing the City Transformation Office aimed at driving Key City Development Projects for Pimpri-Chinchwad City चे कामकाजासाठी मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील प्रभाग क्र.११ मधील कामांच्या तरतुदींमध्ये वाढ/घट करुन वर्गीकरण करणेबाबत – मा.सुवर्णा बुर्डे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३२) जाहिरात फलक उभारणेकामी मान्यता देणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३३) पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ या कालावधीत वस्तीपातळीवर प्रशिक्षण योजना राबविणेबाबत – मा.सुवर्णा बुर्डे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३४) मा.स्थायी समिती ठराव क्र.९०२१, दि.१७/०३/२०२१ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.सुवर्णा बुर्डे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) शहरातील १८ वर्षापुढील नागरिकांना कोविड प्रतिबंधक लस मोफत देणेबाबत - मा.सुवर्णा बुर्डे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) कासारवाडी येथे विपश्यना केंद्र उभारणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३७) नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविणेकामी मानधन तत्वावर नेमणुक करणेबाबत - मा.सुवर्णा बुर्डे, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ९२८१ विषय क्रमांक – ०१
दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – सुरक्षा
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/३१२/२०२१, दि.०९/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात कोविड-१९ प्रतिबंधक कार्य करण्यासाठी विविध घटकांशी समन्वय साधून मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्यासाठी जा.क्र.वैद्य/०९/कावि/१२३५/२०२१ दिनांक ०४/०४/२०२१ रोजीच्या आदेशान्वये कळविणेत आलेले आहे. त्यानुसार सर्व समन्वय अधिकारी यांच्या सुचनेनुसार सुरक्षा विभागाने तातडीने तात्पुरत्या स्वरुपात जम्बो कोविड केअर सेंटर व कार्यन्वित कोविड केअर सेंटरवर सुरक्षा व्यवस्था केलेली आहे. ई निविदा नोटीस क्रमांक २/४/२०२०-२०२१ अन्वये सुरक्षा विभागाकडे ठेकेदारी पदध्तीने व सद्यस्थितीत जॅम्बो कोविड सेंटर व कोविड केअर सेंटर CCC वर मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस ही संस्था कार्यरत आहे. सदर संस्थेकडून ठेकेदारी पदध्तीने प्रति कर्मचारी प्रती माह र.रु.२३,१३४/- प्रमाणे सदर संस्थेव्दारे तातडीने तात्पुरत्या स्वरुपात समन्वय अधिकारी यांच्या सुचनेनुसार सुरक्षा विभागामार्फत नियुक्त्या करणेत आलेल्या आहेत. अण्णासाहेब मगर स्टेडिअम येथील जंबो हॉस्पिटल येथे दिनांक ०२/०४/२०२१ रोजी पासून अतिरिक्त १२ रखवालदारांचे मदतनीस नियुक्त करण्यात आलेले आहेत. नियुक्त करणेत आलेल्या रखवालदारांचे मदतनीस यांना दि.०२/०४/२०२१ ते दि.३१/०५/२०२१ पर्यंत एकूण र.रु.५,४५,९६२/- एवढा खर्च अपेक्षित आहे व म्हाळुंगे म्हाडा CCC, चिखली घरकुल येथील “डी” व “बी” इमारत, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बालेवाडी CCC, जुने, नवीन भोसरी रुग्णालय व इंद्रायणी नगर CCC येथे असे एकूण ५० अतिरिक्त रखवालदारांचे मदतनीस यांस र.रु.२१,२०,६१७/- (अक्षरी र.रू.एकवीस लाख वीस हजार सहाशे सतरा फक्त) ऐवढा खर्च अपेक्षित आहे. सर्व कोविड केअर सेंटर दि.०६/०४/२०२१ ते दि.३१/०५/२०२१ पर्यंत किंवा कोविड केअर सेंटरबाबत पुढील आदेश निर्गत होईपर्यंत सुरक्षा व्यवस्था करण्याचे कामकाजास व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२८२ विषय क्रमांक – ०२
दिनांक – २८/०४/२०२१
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३१ दि.०८/०४/२०२१

विषय क्रमांक ०२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२८३ विषय क्रमांक – ०३
दिनांक – २८/०४/२०२१
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३२ दि.०८/०४/२०२१
विषय क्रमांक ०३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२८४ विषय क्रमांक – ०४
दिनांक – २८/०४/२०२१
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३३ दि.०८/०४/२०२१
विषय क्रमांक ०४ दप्तरी दाखल करणेत येत आहे.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२८५ विषय क्रमांक – ०५
दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१७/कावि/८८५/२०२१, दि.२२/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रांतर्गत कोवीड १९ विषाणुमुळे बाधीत रुग्णांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे कोवीड १९ चे लसीकरण, कॉन्ट्रक्ट ट्रेसिंग, स्वॅब टेस्टिंग, रॅपीड अँन्टीजेन/आरटीपीसीआर टेस्टिंग, नव्याने सुरु होणारे कोवीड केअर सेंटर, गृह विलगीकरण कक्षातील (Home Isolation) रुग्णांची माहीती घेणेकामी तसेच कोवीड १९ अनुषंगाने झोन निहाय व तदअनुषंगीक कामकाज करणेकामी विशेष बाब म्हणून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या मानधनावरील तज्ञ वैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय अधिकारी व इतर पॅरामेडिकल कर्मचा-यांना सध्या दिल्या जात असलेल्या मानधनावर वेळोवेळी निर्गत केलेल्या आदेशाची मुदत संपलेनंतर ०१ दिवसांची सेवा पुर्णतः खंडीत करुन त्यांना पुढील दोन महिने कालावधीकरीता आवश्यकतेनुसार वेळोवेळी मुदतवाढ देणेस, तसेच त्यांना द्यावयाचे मानधनाचे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२८६ विषय क्रमांक – ०६
दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – मध्य.सा.भां., वैद्यकिय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/४४२/२०२१, दि.१७/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) यास अधिन राहून कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मनपा हद्दीमधील नागरिकांची Covid-19 ची तपासणी करणेकामी महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक-भांखस-२०१४/प्र.क्र./८२/भाग-III/ उदयोग-४, दिनांक ०१/१२/२०१६ अन्वये ३.३.२(ड) नुसार

M/s.Sudarshan Pharma Industries Ltd., यांना दिलेल्या पुनर्प्रत्ययी आदेशान्वये Immunoquick Covid-19 Rapid Antigen Test Kit २,००० किटस् (५०,००० टेस्ट) र.रु.४८/- अधिक १२% GST प्रमाणे येणा-या र.रु.२४,००,०००/- (अक्षरी र.रू.चोवीस लाख फक्त) अधिक १२% GST चे खर्चास व सदरचा खर्च कोरोना निधी या लेखाशिर्षावर खर्ची टाकण्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२८७ विषय क्रमांक – ०७

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.उप आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.मभां/१६/कावि/१५०/२०२१, दि.१२/०४/२०२१

मा.उप आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयास आवश्यक सेंट्रल व्हॅक्युम (सक्शन) मशीन पुरवठा करुन बसविणेकामी ई.नि.सु.क्र.45/2020-21 नुसार प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.नियो इंजिनिअर्स, पुणे यांचे एकुण र.रु.18,85,128/- हे अंदाजपत्रकीय दर र.रु.19,52,192/- पेक्षा 3.43 टक्केने कमी म्हणजेच र.रु.18,85,128/- (अक्षरी र.रू.अठरा लाख पंच्याऐंशी हजार एकशे अठ्ठावीस फक्त) आहेत. सदरचे दर स्विकृत करणेत आलेले असुन मे.नियो इंजिनिअर्स, पुणे यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२८८ विषय क्रमांक – ०८

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१६/कावि/१५७/२०२१, दि.१६/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसारात कोरोना–19 या संसर्गजन्य आजारामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे आपत्कालीन परिस्थित कोरोनाच्या अटकावासाठी व कोरोना साथीचा सामना करण्यासाठी त्यानुसार वाढती रुग्णसंख्या विचारात घेता मनपाने तयार केलेले आण्णासाहेब मगर स्टेडीयम जम्बो कोविड सेंटर (DCH) रुग्णालय येथील रुग्णालयात नव्याने आयसीयु व्हेंटीलेटर 50 बेडस करीता मेडीकल गॅस पाईप लाईन बसविणे आवश्यक असलेने, जम्बो कोविड सेंटर सुरु करताना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे मार्फत विहीत कार्यपध्दती राबवुन कामकाज आदेश दिलेल्या M/s Jess Ideas Pvt. Ltd, Mumbai यांचेकडून त्यांनी दिलेल्या दि.13/04/2021 चे दरपत्रकानुसार र.रु.78,94,908/- (अक्षरी र.रू.अठ्याहत्तर लाख चौ-यान्नव हजार नऊशे आठ फक्त) मध्ये थेट पध्दतीने बसविणेकामी येणारे खर्चास कार्योत्तर मान्यता व M/s Jess Ideas Pvt. Ltd, Mumbai यांचेबरोबर साथरोग अधिनियम 1897, शासन सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दि.13 व 14 मार्च 2020, आपत्ती व्यस्थापन कायदा 2005 मधील कलम 41 व 50, महानगरपालिका अधिनियम 63(6) व 67 (3)(क), शासन खरेदी नियमावली दि.01/12/2016 मधील नियम क्र.3.2.6 मधील तरतुदी व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची प्रकरण 5(2)(2) नुसार कार्योत्तर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ९२८९ विषय क्रमांक – ०९
दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.निता पाडाळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/३३०/२०२१, दि.१९/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/81/03/2019-20 अन्वये प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील गंगोत्रीनगर, विजयनगर, भालेकरनगर, साईनाथनगर, तुळजाभवानी नगर, सुवर्ण पार्क गुरुदत्तनगर, पंचरत्ननगर व इतर उर्वरित परिसरातील रस्ते अद्ययावत पध्दतीने विकसीत करणेकामी नि.र.रु.६,६३,४१,९४६/- लघुत्तम ०१ ठेकेदार मे.वैदेही कन्स्ट्रक्शन यांची निविदा निविदा अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.६९१५ दि.२८-०२-२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे. तथापि, मा.आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र.स्था/नि/इ-मुख्य/२२०/२०२० दि.१६/१२/२०२० अन्वये मे.वैदेही कन्स्ट्रक्शन यांना अनामत/अतिरिक्त अनामत पोटी सादर केलेल्या बँक गॅरंटया बनावट सादर केल्यामुळे त्यांचा काळया यादीत समाविष्ट करुन सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेणेस ०३ वर्षासाठी प्रतिबंध करणेस आदेश निर्गमित करणेत आले असुन या कामाचे लघुत्तम ०२ चे ठेकेदार यांनी लघुत्तम ०१ चे ठेकेदार यांचे दरामध्ये सदर काम करणेस तयारी दर्शविलेस त्यांची निविद स्विकृत करणेस मा.आयुक्त सो यांनी दि.१६/१२/२०२० रोजीचे प्रस्तावान्वये आदेशित केलेले आहे. त्यामुळे मे.वैदेही कन्स्ट्रक्शन यांची निविदा रद्द करुन लघुत्तम ०२ ठेकेदार मे.ए.जी.असोशिएटस यांनी लघुत्तम ०१ ठेकेदार यांचे दरामध्ये काम करणेस संमती दिली असल्याने लघुत्तम ०२ चे ठेकदार मे.ए.जी.असोशिएट्स यांची निविदा मंजुर करणेस प्रस्तावित करणे येत आहे. नि.नो. क्र.८१/०३/२०१९-२० अन्वये मे.ए.जी.असोशिएट्स नि.र.रू.6,63,41,946/- (अक्षरी र.रु.सहा कोटी त्रेसष्ट लाख एक्केचाळीस हजार नऊशे शेहेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.6,56,54,099/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम मे.ए.जी.असोशिएट्स यांचेकडुन र.रु.6,56,54,099/- पेक्षा 25.57% कमी म्हणजेच र.रु.4,88,66,346/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.5,46,047/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,41,800/- = एकुण र.रु.4,95,54,193/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९० विषय क्रमांक – १०
दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/३२९/२०२१, दि.१९/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/81/01/2019-20 अन्वये प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव मधील उर्वरित रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणेकामी नि.र.रु.६,६४,६९,०७७/- लघुत्तम ०१

ठेकेदार मे.वैदेही कन्स्ट्रक्शन यांची निविदा अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.६९१४ दि.२८-०२-२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे. तथापि, मा.आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र.स्था/नि/इ-मुख्य/२२०/२०२० दि.१६/१२/२०२० अन्वये मे.वैदेही कन्स्ट्रक्शन यांना अनामत/अतिरिक्त अनामत पोटी सादर केलेल्या बँक गॅरंटया बनावट सादर केल्यामुळे त्यांचा काळया यादीत समाविष्ट करुन सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेणेस ०३ वर्षासाठी प्रतिबंध करणेस आदेश निर्गमित करणेत आले असुन या कामाचे लघुत्तम ०२ चे ठेकेदार यांनी लघुत्तम ०१ चे ठेकेदार यांचे दरामध्ये सदर काम करणेस तयारी दर्शविलेस त्यांची निविद स्विकृत करणेस मा.आयुक्त सो. यांनी दि.१६/१२/२०२० रोजीचे प्रस्तावान्वये आदेशित केलेले आहे. त्यामुळे मे.वैदेही कन्स्ट्रक्शन यांची निविदा रद्द करुन लघुत्तम ०२ ठेकेदार मे.ए.जी.असोशिएटस यांनी लघुत्तम ०१ ठेकेदार यांचे दरामध्ये काम करणेस संमती दिली असल्याने लघुत्तम ०२ चे ठेकदार मे.ए.जी.असोशिएट्स यांची निविदा मंजुर करणेस प्रस्तावित करणे येत आहे. नि.नो.क्र.८१/०१/२०१९-२० अन्वये मे.ए.जी.असोशिएट्स नि.र.रू.6,64,69,077/- (अक्षरी र.रु.सहा कोटी चौसष्ट लाख एकोणसत्तर हजार सत्याहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.6,61,72,995/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम मे.ए.जी.असोशिएट्स यांचेकडुन र.रु.6,61,72,995/- पेक्षा 25.57% कमी म्हणजेच र.रु.4,92,52,560/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.75,190/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,20,893/- = एकुण र.रु.4,95,48,643/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९१ | विषय क्रमांक – ११

दिनांक – २८/०४/२०२१ | विभाग – पाणीपुरवठा मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे | अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचे पत्र क्र.पापु/कावि/२९५/२०२०, दि.२७/११/२०२०

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इमारती व इतर स्ट्रक्चरचे संरक्षणात्मक परीक्षण (Structural Audit) अनिवार्य कारणेबाबतच्या अधिनियमात केलेल्या सूचनेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६५(अ) प्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समिती ठराव क्र.४०८० दि.१०/०९/२०१३ अन्वये मान्यता प्राप्त स्ट्रक्चरल ऑडिटर पॅनेलमध्ये मे.के.बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचा सल्लागार म्हणून समावेश आहे. तसेच त्यांच्यामार्फत पुणे, पिं.चिं.म.न.पा. आणि राज्य व केंद्र सरकारच्या विविध विभागातील इमारती व उंच पाण्याच्या टाक्यांच्या तसेच जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या संरक्षणात्मक परीक्षणाचे कामे केलेली आहेत. मे.के.बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांना संबंधित काम करणेबाबत विचारणा केली असता सदर काम करणेस त्यांनी तयारी दर्शविली आहे. तरी “क” प्रभाग अंतर्गत उंच पाण्याच्या टाक्यांचे संरक्षणात्मक परीक्षण (Structural Audit) करणे आवश्यक असून याकामी मे.के.बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची या कामासाठी नेमणूक

करून त्यांना कामाचा आदेश देणे व सोबत जोडलेल्या म.न.पा. च्या मा.आयुक्त मान्य दरसूचीनुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९२ विषय क्रमांक – १२

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१६/कावि/१६८/२०२१, दि.२०/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात कोरोना–19 या संसर्गजन्य आजारामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे आपत्कालीन परिस्थित कोरोनाच्या अटकावासाठी व कोरोना साथीचा सामना करण्यासाठी त्यानुसार वाढती रुग्णसंख्या विचारात घेता मनपाने तयार केलेले ऑटो क्लस्टर कोविड सेंटर (DCH) रुग्णालय येथील रुग्णालयात नव्याने आय.सी.यु.व्हेंटीलेटर 16 बेडस करीता मेडीकल गॅस पाईप लाईन बसविणे आवश्यक असलेने, ऑटो क्लस्टर कोविड सेंटर सुरु करताना मनपाने यापुर्वी ऑटो क्लस्टर रुग्णालयासाठी मागविणेत आलेल्या अल्प मुदतीची जाहीर सुचना क्र.07/2020-21 (Expression of Interest) मंजुर दरानुसार विहीत कार्यपध्दती राबवुन कामकाज आदेश दिलेल्या मे.ड्रग हाऊस, पुणे यांचेकडून त्यांनी दिलेल्या दि.13/04/2021 चे दरपत्रकानुसार र.रु.11,76,978/- + GST मध्ये थेट पध्दतीने बसविणेकामी येणारे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.ड्रग हाऊस, पुणे यांचेबरोबर साथरोग अधिनियम 1897, शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दि.13 व 14 मार्च 2020, आपत्ती व्यस्थापन कायदा 2005 मधील कलम 41 व 50, महानगरपालिका अधिनियम 63 (6) व 67(3)(क), शासन खरेदी नियमावली दि.01/12/2016 मधील नियम क्र.3.2.6 मधील तरतुदी व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची प्रकरण 5(2)(2) नुसार कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९३ विषय क्रमांक – १३

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.पअक/कावि/३२३/२०२१, दि.२०/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पर्यावरण विभागाकडील नि.नो.क्र.03/12/2020-2021 अन्वये च-होली येथील मैलाशुध्दीकरण केंद्राची देखभाल व दुरुस्ती करणेकामी L1 मे.पुजा कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी देऊ केलेला निविदा दर 19.03% कमी दराचे परफॉमन्स सिक्युरिटी र.रु.24,09,800/- मुदतीत जमा न केल्याने निविदेतील L2 मे.जे.डी.खान्देशी यांना विचारणा करणेस मा.अति.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.जे.डी.खान्देशी यांनी त्यांचे दि.26/02/2021 रोजीच्या पत्रान्वये सुधारित दर 19.04% कमी देणेत आलेला असुन PSD मनपा पावती क्र.बी-१३ दि.8/4/21 रोजी मनपा फंडात जमा केलेली आहे. मे.जी.डी.खान्देशी नि.र.रू.1,71,38,935/- (अक्षरी र.रू.एक कोटी एक्काहत्तर लाख अडोतीस हजार नऊशे पस्तीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,71,38,935/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त

ठेकेदाराकडून र.रु.1,71,38,935/- पेक्षा 19.04% कमी म्हणजेच र.रु.1,38,75,682/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.1,38,75,682/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९४ विषय क्रमांक – १४

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/११/कावि/६३/२०२१, दि.१९/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

कोरोना बाधित मृत व्यक्तींच्या पार्थिवावर महानगरपालिकेच्या विद्युत/गॅस दाहिनीमध्ये अंत्यविधी करण्यात येत आहेत. तथापि, कोरोना बाधितांच्या वाढत्या मृत्यू संख्येमुळे आरोग्य विभागाकडील आदेश क्र.आमुका/२/कावि/८६/२०२१ दि.१५/०४/२०२१ अन्वये निगडी, सांगवी, भोसरी, लिंकरोड, चिंचवड व नेहरुनगर येथील पारंपारिक स्मशानभूमींमध्ये कोरोना बाधित मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. कोरोना बाधित व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी आवश्यक असलेले लाकूड/सरणाची उपलब्धता करण्याकरिता वरील स्मशानभूमींकरिता काळजीवाहक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या संस्थांमार्फतच लाकूड/ सरणाची उपलब्धता करण्यात येऊन त्यापोटी होणारा खर्च हा त्यांचे मासिक बिलामध्ये अदा करणे आवश्यक आहे. तथापि, एका मृतदेहाचे अंतिम संस्कारासाठी साधरणपणे ९ ते १० मण लाकूड तसेच १५० गोव-यांची आवश्यकता असते. लाकडाचा दर हा र.रु.४५०/- प्रति मण इतका असून एका गोवरीची किंमत र.रु.८/- ते १०/- इतकी आहे. म्हणजेच १० मण लाकडाकरिता र.रु.४५००/- व १५० गोव-यांकरिता अंदाजे र.रु.१५००/- असे एकूण र.रु.६०००/- इतकी रक्कम मृतदेहाचे अंत्यसंस्कारासाठी आवश्यकता असते. सद्यस्थितीत वरील स्मशानभूमींमध्ये कार्यरत असलेल्या काळजीवाहक संस्थांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | स्मशानभूमीचे नाव | काळजीवाहक संस्था | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | निगडी स्मशानभूमी | मे.शुभम उद्योग | ९०११०९३६९२ |
| २) | सांगवी स्मशानभूमी | मे.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सह.संस्था | ९६२३५७८१५७ |
| ३) | भोसरी स्मशानभूमी | मे.शुभम उद्योग | ९०११०९३६९२ |
| ४) | लिंकरोड, चिंचवड स्मशानभूमी | मे.जयभवानी एंटरप्रायझेस | ७७२००४७५९१ |
| ५) | नेहरुनगर स्मशानभूमी | मे.जयभवानी एंटरप्रायझेस | ७७२००४७५९१ |

सबब, वरील सर्व स्मशानभूमींमध्ये कोरोना बाधित रुग्णांच्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणेकरिता लाकूड/सरण उपलब्ध करण्याचा खर्च प्रति मृतदेह र.रु.६,०००/- याप्रमाणे निश्चित करुन वरील संस्थांना त्यांचे मासिक बिलामध्ये अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील कामासाठी प्रति मृतदेह अंत्यसंस्कारासाठी र.रु.६,०००/- यामध्ये आणखी र.रु.२,०००/- इतकी वाढ करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९५ विषय क्रमांक – १५

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/३/कावि/२९५/२०२१, दि.२३/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाचे कोवीड १९ च्या कामाकाजातील सेवेमध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून तसेच कोवीड १९ संसर्गामुळे वाढत असलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे पार्श्वभूमीवर तातडीची बाब म्हणून यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील COVID -19 Triage Area मधील कामकाजाकरिता १० रिसेप्शनिष्ट व १० कौन्सिलर संवर्गातील कर्मचा-यांची आवश्यकता आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील COVID -19 Triage Area मधील कामकाजाकरिता मे.रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेमार्फत उक्त नमुद केलेप्रमाणे कर्मचारी तात्काळ उपलब्ध करुन देणेस तसेच सदर कर्मचा-यांना प्रत्येकी र.रु.२३,३००/- प्रमाणे दोन महिने कालावधी करिता येणारा एकूण खर्च र.रु.९,३२,०००/- (अक्षरी र.रू.नऊ लाख बत्तीस हजार फक्त) अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यतेच्या आधीन राहून व करारनामा करून आदेशातील अटी व शर्तीं प्रमाणे मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांना कामकाज देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील कामासाठी र.रु.९,३२,०००/- इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९६ विषय क्रमांक – १६

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – मध्य.सा.भां.,वैद्यकिय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/४४८/२०२१, दि.२०/०४/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी तातडीचे कामकाजास्तव सदयस्थितीत संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव पुन्हा एकदा मोठया प्रमाणात वाढलेने पॉझीटीव्ह रुग्णांची झपाटयाने वाढ होत असून कोविड-१९ रुग्णांचे प्रमाण देखील वाढलेले आहे. मृतदेह रॅपिंग टीमकरीता कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम जम्बो रुग्णालय येथे व ऑटो क्लस्टर येथे M/s.Medbros Healthcare Pvt. Ltd., यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून कोरोनामुळे मयत रुग्णांचे मृतदेह रुग्णवाहिका/शववाहिकेतून उतरविणे, अंत्यसंस्कारासाठी नंबर लावणे, विदयुत दाहिनी मध्ये चढविणे व स्मशानभूमी/दफनभूमी मध्ये

नियमानुसार अंत्यसंस्कार करणेबाबतचे सर्व प्रकारचे कामासाठी स्मशानभूमी/ दफनभूमी मध्ये तात्काळ २८ कर्मचारी उपलब्ध करुन देणेकामी व त्याकामी र.रु.२८,०२१/- प्रति महा प्रति कर्मचारी प्रमाणे र.रु.७,८४,५८८/- प्रमाणे दोन महिन्यांकरीता येणा-या र.रु.१५,६९,१७६/-(अक्षरी र.रू.पंधरा लाख एकोणसत्तर हजार एकशे शहात्तर फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९७ विषय क्रमांक – १७

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/६१२/२०२१, दि.२१/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु संसर्गाचा धोका निर्माण झाला आहे, कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid-19 या संसर्गजन्य आजारामुळे पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य विषयक आपत्कालिन परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोरोना विषाणूंच्या संसर्गाला प्रतिबंध घालण्यासाठी महापालिकेकडून आवश्यक ती दक्षता घेणेत येत असून त्या अनुषंगाने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मनपा रुग्णालये, जंम्बो कोविड सेंटर, ऑटो क्लस्टर कोविड हॉस्पिटल या ठिकाणी कोरोना विषाणुमुळे संसर्ग झालेल्या बाधित रुग्णांची संख्या वाढत असुन त्याकरीता Injection Remdesivir 100mg ची मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे तथापी आवश्यक त्या प्रमाणात पुरवठा होत नसल्याने बाजारात उपलब्ध असलेल्या ठिकाणाहुन औषधे खरेदी करणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.कुंदन मेडीको, चिंचवड यांचेकडून 120 Vials थेट पध्दतीने र.रु.1650/- + 12% GST = 1848/- (सर्व करासहीत) या दराने एकुण र.रु.2,21,760/- इतका खर्च येणार आहे. सदर खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दिनांक १३/०३/२०२० व १४/०३/२०२० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ४१ व ५० महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) तसेच महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार मे.कुंदन फार्मा. चिंचवड यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदीकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९८ विषय क्रमांक – १८

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/६१३/२०२१, दि.२१/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु संसर्गाचा धोका निर्माण झाला आहे, कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid-19 या संसर्गजन्य आजारामुळे पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य विषयक आपत्कालिन परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोरोना विषाणूंच्या संसर्गाला प्रतिबंध घालण्यासाठी महापालिकेकडून आवश्यक ती दक्षता घेणेत येत असून त्या अनुषंगाने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मनपा रुग्णालये, जंम्बो कोविड सेंटर, ऑटो क्लस्टर कोविड हॉस्पिटल या ठिकाणी कोरोना विषाणुमुळे संसर्ग झालेल्या बाधित रुग्णांची संख्या

वाढत असुन त्याकरीता Injection Remdesivir 100mg ची मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे तथापी आवश्यक त्या प्रमाणात पुरवठा होत नसल्याने बाजारात उपलब्ध असलेल्या ठिकाणाहुन औषधे खरेदी करणे आवश्यक आहे. त्यानुसार Mumbai Corporation of Greater Mumbai Bid No.7100207702 नुसार र.रु.1568/- (सर्व करासहीत) या दराने उत्पादीत कंपनी मे.Mylan Pharmaceuticals Pvt Ltd यांना DMC/CPD/OD/16, दि.07/04/2021 रोजी मुंबई महानगरपालिकेने पुरवठा आदेश दिला आहे. त्यानुसार मनपाचे विविध रुग्णालये, ऑटो क्लस्टर कोविड हॉस्पिटल, जम्बो कोविड हॉस्पीटल करीता Inj.Remdesivir 100mg खरेदीकामी थेट पध्दतीने करणेकरीता 1000 Vials साठी पुरवठा आदेश क्र.CSD/245/2021, दिनांक 12/04/2021 रोजी तातडीने र.रु.1568/- या दराने देण्यात आलेला आहे. त्याकरीता एकुण र.रु.15,68,000/- (अक्षरी र.रू. पंधरा लाख अडूसष्ठ हजार फक्त) इतका खर्च येणार आहे. सदर खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दि.१३/०३/२०२० व १४/०३/२०२० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ४१ व ५०, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) तसेच महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार मे.Mylan Pharmaceuticals Pvt Ltd यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदीकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२९९ विषय क्रमांक – १९

दिनांक – २८/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/६१४/२०२१, दि.२१/०४/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

